# पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (PUP) परीक्षा (इयत्ता ५वी)

## PRE UPPER PRIMARY (PUP) SCHOLARSHIP EXAMINATION (STD - 5$^{TH}$)

**(शासकीय विद्यानिकेतन, आदिवासी विद्यानिकेतन, वि.जा.भ.ज. विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेसह)**

## ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबत मुद्देनिहाय सूचना

**(शाळेने विद्यार्थ्यांची माहिती जनरल रजिस्टरमधील नोंदणीप्रमाणे अचूकपणे भरावी.)**

### १) सर्वसाधारण सूचना :-

- शाळा नोंदणी प्रपत्र भरल्यानंतर आपणास विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र उपलब्ध होतील.
- लॉगीन केल्यानंतर डॅशबोर्डवरील डाव्या बाजूस असलेल्या Student Registration - STD. 5$^{th}$ (PUP) या बटनावर क्लिक करावे.
- Verify Saral मधील Enter Student ID या रकान्यामध्ये विद्यार्थ्याचा 19 अंकी सरल आयडी टाकून Verify या बटनावर क्लिक करावे. त्यानंतर आपणास विद्यार्थ्याचे ऑनलाईन आवेदनपत्र उपलब्ध होईल.
- जर विद्यार्थ्याचा 19 अंकी सरल आयडी उपलब्ध नसेल तर त्या करीता पुढीलप्रमाणे 19 अंक टाईप करावे. प्रथम 4 अंक 2018 हे असतील त्यानंतरचे 11 अंक आपल्या शाळेचा युडायस क्रमांक टाकावे व शेवटचे 4 अंक आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचा अनुक्रमांक टाकून Verify या बटनावर क्लिक करावे. **उदा**. :-

| परीक्षेचे वर्ष | शाळेचा युडायस क्रमांक | विद्यार्थ्यांचा अनुक्रमांक |
|---|---|---|
| 2018 | 27010101001 | 0001 |
| 2018 | 27010101001 | 0002 |

- त्यानंतर आपणास Manual Registration हा पर्याय उपलब्ध होईल.
- Manual Registration या बटनावर क्लिक केल्यानंतर आपणास विद्यार्थ्याचे ऑनलाईन आवेदनपत्र उपलब्ध होईल.

### २) फोटो (Photo)

- प्रत्येक विद्यार्थ्यांचा फोटो व स्वाक्षरी ऑनलाईन आवेदनपत्रात अपलोड करणे अनिवार्य आहे. त्यामुळे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांचे फोटो व स्वाक्षरी स्कॅन करुन जतन करुन ठेवावेत.
- विद्यार्थ्याचा फोटो व स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यपध्दती - ८.५ से.मी. X ४.५ से. मी. आकाराच्या पांढऱ्या कागदावर रंगीत फोटो चिकटवून त्याखाली काळया शाईच्या पेनाने स्पष्ट स्वाक्षरी करावी. सदरचा फोटो व स्वाक्षरी स्कॅन करावी.
- फोटो व स्वाक्षरी .JPG, .JPEG किंवा .PNG या फॉरमॅटमध्ये सेव्ह करावा.
- फोटो व स्वाक्षरीची साईज १०० kb पेक्षा जास्त नसावी.

3) **विद्यार्थ्यांचे नाव** (Student Name) -

- **आडनांव** (Last Name) - इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये टाईप करा.
- **प्रथम नांव** (First Name) - इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये टाईप करा.
- **वडीलांचे नांव** (Father Name) - इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये टाईप करा.
- **आईचे नांव**(Mothers Name) - इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये टाईप करा.
- इंग्रजी कॅपिटल लेटर्स शिवाय इतर कोणतीही लिपी (देवनागरी - मराठी/हिंदी, इ.) वापरु नये.

4) **लिंग** (Gender)

- ड्रॉप डाऊनमधून स्त्री/पुरुष या पैकी अचूक पर्याय निवडा.

5) **दिव्यांग आहे का** ? (If Differently Abled ?)

- ड्रॉप डाऊनमधून आहे/नाही पैकी अचूक पर्याय निवडा.
- आहे पर्याय निवडल्यास लेखनिक आवश्यक आहे का ? (Need a Writer For Exam ?) असा प्रश्न स्क्रीनवर उपलब्ध होईल.
- लेखनिक हवा असल्यास आहे (Yes) हा पर्याय निवडा, नको असल्यास नाही (No) हा पर्याय निवडा.
- लेखनिकास शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची परीक्षेपूर्वी किमान 8 दिवस अगोदर मान्यता घ्यावी.

6) **जन्मदिनांक** (Date of Birth)-

- शाळेच्या जनरल रजिस्टरमधील रेकॉर्डप्रमाणे Day, Month,Year या स्वरुपात संबंधित रकान्यात विद्यार्थ्यांची जन्मतारीख नोंदवा. (ड्रॉप डाऊन लिस्टमधून दिवस, महिना, वर्ष निवडा.)
- **कमाल वयोमर्यादा**
  - ➢ विद्यार्थ्यांचे वय परिक्षेस बसण्याच्या कमाल विहित वयोमर्यादेपेक्षा जास्त वय असल्यास स्क्रीनवर 'विहित कमाल वयोमर्यादेपेक्षा वय जास्त असल्याने शिष्यवृत्तीस अपात्र' असा संदेश दिसेल.
  - ➢ विहित कमाल वयोमर्यादेपेक्षा अधिक वय असलेल्या विद्यार्थ्यांना आवेदनपत्र भरता येईल तसेच परीक्षेस प्रविष्ट होता येईल. मात्र अशा विद्यार्थ्यांना परीक्षेत कटऑफ इतके/ कट ऑफ पेक्षा अधिक गुण मिळाले तरीही त्यांना शिष्यवृत्ती अर्हताधारक घोषित केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

7) **महाराष्ट्राचा रहिवासी आहे का** ? -

- ड्रॉप डाऊनमधून आहे/नाही पैकी अचूक पर्याय निवडा.

8) **आधार कार्ड क्रमांक** (Aadhar Card No.) -

- विद्यार्थ्यास आधार कार्ड मिळाले असल्यास त्यावरील 12 अंकी आधार क्रमांक टाईप करावा.

9) **आधार नोंदणी क्रमांक** (Adhar Enrollment No.)

- विद्यार्थ्यांस आधार कार्ड मिळाले नसल्यास आधार नोंदणी रिसीटवरील 28 अंकी आधार एन्रोलमेंट क्रमांक टाईप करावा.

10) **आरक्षणाचा प्रवर्ग** (Reservation Category)-

- शाळेच्या जनरल रजिस्टरमधील नोंदीप्रमाणे जातीनुसार आरक्षणाचा प्रवर्ग ड्रॉपडाऊन लिस्टमधून अचूकपणे निवडा. (ड्रॉप डाऊन लिस्ट - खुला (GEN), अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), विमुक्त जाती- अ (VJ-A), भटक्या जमाती - ब (NT-B), भटक्या जमाती - क (NT-C), भटक्या जमाती - ड (NT-D), इतर मागासवर्ग (OBC), विषेश मागास प्रवर्ग (SBC).

**विशेष सुचना-**

- महाराष्ट्र शासनाच्या (MSCERT) अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांतील SC, ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क नाही. (मात्र ही सवलत CBSE/ICSE/ इतर अभ्यासक्रमांच्या शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लागू नाही.)
- कोणताही अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांतील उर्वरित (SBC, OBC, OPEN) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क भरावे लागेल.
- चुकीचा आरक्षण प्रवर्ग नोंदविल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची राहील. अशा मुख्याध्यापकाविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्याची शिफारस करण्यात येईल.
- महाराष्ट्र शासनाच्या (MSCERT) अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांतील मागासवर्गीय (SC, ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा H आणि I शिष्यवृत्ती संचासाठी गुणवत्तेनुसार विचार केला जातो. म्हणून आरक्षण प्रवर्ग अचूक नोंदविणे आवश्यक आहे.

11) **परीक्षेचे माध्यम** (Medium of Examination)-

- शाळा माहिती प्रपत्र भरतेवेळी निवडलेली माध्यमे ऑनलाईन आवेदनपत्रात उपलब्ध होतील.
- उपलब्ध असलेल्या माध्यमांपैकी विद्यार्थी ज्या माध्यमातून परीक्षेस प्रविष्ट होणार आहे ते माध्यम निवडा.
- सेमी इंग्रजी माध्यम निवडल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळी पेपर क्र.1 मधील गणित या विषयाची व पेपर क्र. 2 मधील बुध्दिमत्ता चाचणी या विषयाची प्रश्नपत्रिका मूळ माध्यम आणि इंग्रजी माध्यम अशा दोन्हीही माध्यमांतून मिळेल.

12) **विद्यार्थी शिकत असलेला अभ्यासक्रम** (Student Studying the course)-

- शाळा माहिती प्रपत्र भरतेवेळी शाळेचा जो/जे अभ्यासक्रम निवडला/ले होता/होते. तो/ते अभ्यासक्रम स्क्रीनवर येथे उपलब्ध होईल/होतील.
- त्यापैकी विद्यार्थी सध्या शाळेत शिकत असलेला अभ्यासक्रम अचूकपणे निवडा.
- **विशेष सुचना**
  - महाराष्ट्र शासनाच्या अभ्यासक्रमात (MSCERT) शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी विचार केला जातो.
  - **चुकीचा अभ्यासक्रम नोंदविल्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीस अपात्र ठरल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची राहील**. अशा मुख्याध्यापकांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्याची शिफारस करण्यात येईल.

13) **वडीलांचे/पालकांचे वार्षिक उत्पन्न** (Father/Parents Annual Income)-

- रु. 20,000/- (वीस हजार रुपये) पर्यंत किंवा रु. 20,000/- (वीस हजार रुपये) पेक्षा जास्त यापैकी अचूक पर्याय निवडा.
- संबंधित विद्यार्थ्यांकडे उत्पन्नाचे प्रमाणपत्र नसल्यास उत्पन्न रु. 20,000/- (वीस हजार रुपये) पेक्षा कमी हा पर्याय निवडू नये.
- संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रु. 20,000/- (वीस हजार रुपये) पर्यंत असल्यास सक्षम अधिकाऱ्यांचे (तहसिलदार/प्रांत अधिकारी) प्रमाणपत्र शाळेने आपल्या स्तरावरुन तपासून दप्तरी जतन करुन ठेवावे.
- F,G,H,I या शिष्यवृत्ती संचासाठी पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 20,000/- (वीस हजार रुपये) पर्यंत असलेल्या विद्यार्थ्यांचा गुणवत्तेनुसार विचार केला जाईल.

14) **आदिवासी क्षेत्रातील आदिवासी** (Area if tribal)-

- हा मुद्दा आदिवासी विद्यानिकेतन प्रवेशाबाबत आहे.
- विद्यार्थी शासनाने जाहिर केलेल्या आदिवासी क्षेत्रातील आदिवासी (S.T.) असल्यास होय हा पर्याय निवडावा, आदिवासी क्षेत्रातील नसल्यास नाही हा पर्याय निवडावा.
- याबाबत अधिक माहितीसाठी आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक -टि.एस.पी. 1086/8710/प्र.क.31/का5, दि. 9 मार्च, 1990 पहावा.

15) **विद्यानिकेतन प्रवेश** (Admission To Public School)-

- पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेसमवेत **शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, विमुक्त जाती भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा** घेण्यात येतात. पुढीलपैकी आवश्यक/लागू असलेल्या विद्यानिकेतन प्रवेशाबाबत योग्य ते पर्याय निवडा.

15.1) **शासकीय विद्यानिकेतनमध्ये प्रवेश हवा आहे का** ?

- प्रवेश हवा असल्यास आहे पर्याय निवडा, नको असल्यास नाही पर्याय निवडा.
- **अटी** -
  - ❖ ग्रामीण क्षेत्रातील शासनमान्य शाळेतील इ. 5 वी मध्ये शिकणारा विद्यार्थी प्रवेश परीक्षेस बसू शकतो.
  - ❖ या विद्यानिकेतनमध्ये केवळ मुलांनाच प्रवेश आहे. (मुलींना प्रवेश नाही).
  - ❖ ही परीक्षा फक्त मराठी माध्यमातून घेतली जाते. (सेमी इंग्रजी माध्यमांपैकी केवळ मराठी+इंग्रजी हे माध्यम निवडता येईल)
  - ❖ वरील अटींची पुर्तता होत असल्यासच या मुद्दयाचे पर्याय Active असतील.
  - ❖ वरील अटीत विद्यार्थी बसत नसल्यास या मुद्दयाचे पर्याय Deactive असतील.

15.2) **आदिवासी विद्यानिकेतनमध्ये प्रवेश हवा आहे का** ?

- प्रवेश हवा असल्यास आहे पर्याय निवडा, नको असल्यास नाही पर्याय निवडा.
- **अटी** -
  - ❖ विद्यार्थी शासनाने जाहीर केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील रहिवासी असावा.
  - ❖ तो अनुसूचित जमातीपैकी (S.T.) असावा.
  - ❖ या विद्यानिकेतनमध्ये केवळ मुलांना प्रवेश आहे. (मुलींना प्रवेश नाही).
  - ❖ ही परीक्षा फक्त मराठी माध्यमातून घेतली जाते. (सेमी इंग्रजी माध्यमांपैकी केवळ मराठी+इंग्रजी हे माध्यम निवडता येईल)

❖ वरील अटींची पुर्तता होत असल्यासच या मुद्दयाचे पर्याय Active असतील.

❖ वरील अटीत विद्यार्थी बसत नसल्यास या मुद्दयाचे पर्याय Deactive असतील.

15.3) **विमुक्त जाती भटक्या जमाती विद्यानिकेतनमध्ये प्रवेश हवा आहे का ?**

- प्रवेश हवा असल्यास आहे पर्याय निवडा, नको असल्यास नाही पर्याय निवडा.
- **अटी** -

❖ राज्य शासनाच्या समाजकल्याण खात्यामार्फत चालविणाऱ्या जाणाऱ्या आश्रमशाळेतील इ. 5 वीत शिकणारा विद्यार्थी असावा.

❖ या विद्यानिकेतमध्ये दोहोंना (मुलगा व मुलगी) प्रवेश आहे.

❖ ही परीक्षा फक्त मराठी माध्यमातून घेतली जाते. (सेमी इंग्रजी माध्यमांपैकी केवळ मराठी+ इंग्रजी हे माध्यम निवडता येईल)

❖ वरील अटींची पुर्तता होत असल्यासच या मुद्दयाचे पर्याय Active असतील.

❖ वरील अटीत विद्यार्थी बसत नसल्यास या मुद्दयाचे पर्याय Deactive  असतील.

16) **शुल्क** (Fee) -

- शासन निर्णय क्र.एस.पी.ई.(2011/859/11) साशि-1, दि. 03/12/2012 व शासन निर्णय क्र. एफईडी-4014/643/प्र.क्र.4/एसडी-5 , दि. 15/11/2016 नुसार दर पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ. क्र.** | **शुल्काचा प्रकार** | **पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. 5 वी)** | | **पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. 8 वी)** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **बिगरमागास** | **मागास/दिव्यांग** | **बिगर मागास** | **मागास/दिव्यांग** |
| 1. | प्रवेश शुल्क | रु. 20/- | रु. 20/- | रु. 20/- | रु. 20/- |
| 2. | परीक्षा शुल्क | रु. 60/- | नाही | रु. 60/- | नाही |
| 3. | एकूण शुल्क | रु. 80/- | रु. 20/- | रु. 80/- | रु. 20/- |
| 4. | विलंब शुल्क (नियमित शुल्कासह आवेदनपत्र भरण्याची मुदत संपल्यानंतर) | रु. 50/- | रु. 50/- | रु. 50/- | रु. 50/- |
| 5. | अतिविलंब शुल्क (विलंब शुल्कासह आवेदनपत्र भरण्याची मुदत संपल्यानंतर) | **प्रवेश शुल्क + परीक्षा शुल्क + विलंब शुल्क + अतिविलंब शुल्क प्रतिदिनी रु. 10/- याप्रमाणे**. | | | |
| 6. | शाळा संलग्नता शुल्क रु. 200/- (NTS/NMMS परीक्षेकरीता  परीक्षा परिषद शाळा संलग्नता शुल्क भरले असले तरी शिष्यवृत्ती परीक्षेकरीता स्वतंत्रपणे शाळा संलग्नता शुल्क रु. 200/- भरणे अनिवार्य राहील.) | | | | |

- ऑनलाईन आवेदनपत्रात प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क, विलंब शुल्क, अतिविलंब शुल्क, एकुण शुल्क आपोआप गणले जाऊन संबंधित चौकटीत नोंदविले जाईल.

  **विशेष सुचना-**

  - प्रवेश शुल्क रु. 20/- सर्व विद्यार्थ्यांना (मागासवर्गीय, बिगर मागासवर्गीय व दिव्यांग) लागू आहे.

- **परीक्षा शुल्क** -
  - महाराष्ट्र शासनाचा (MSCERT) अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांतील SC, ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क नाही. मात्र ही सवलत CBSE/ICSE/ इतर अभ्यासक्रमाच्या शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्याना लागू नाही.
  - उर्वरित प्रवर्ग (SBC, OBC, OPEN) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना रु. 60/- परीक्षा शुल्क भरावे लागेल.
  - दिव्यांग विद्यार्थ्यासाठी परीक्षा शुल्क लागू नाही.
- **विलंब शुल्क-**
  - नियमित शुल्कासह ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याची मुदत संपल्यानंतर सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व अभ्यासक्रमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांना (बिगर मागास, मागास व दिव्यांग) रु. 50/- इतके विलंब शुल्क भरावे लागेल.
- **अतिविलंब शुल्क-**
  - विलंब शुल्कासह आवेदनपत्र भरण्याची मुदत संपल्यानंतर सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व अभ्यासक्रमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांना (बिगर मागास, मागास व दिव्यांग) रु.10/- प्रतिदिन इतके विलंब शुल्क भरावे लागेल.

17) **विद्यार्थ्यांच्या बँक खात्याची माहिती** -

- यामध्ये विद्यार्थ्यांच्याच बँक खात्याची माहिती भरावी.
- त्यामध्ये विद्यार्थ्याच्या बँक खाते क्रमाक, IFS CODE, बँकेचे नाव व शाखेचे नाव ही माहिती भरावी.
- विद्यार्थ्यांचे बँक खाते नसल्यास रकाना रिकामा सोडावा.

18) **महत्वाचे** -

- उपरोक्तनुसार ऑनलाईन आवेदनपत्रातील सर्व माहिती भरल्यानंतर Preview या बटनावर क्लिक करावे.
- आपणास विद्यार्थ्याचे ऑनलाईन भरलेले आवेदनपत्र स्क्रिनवर दिसेल.
- ऑनलाईन आवेदनपत्रात काही दुरुस्ती करावयाची असल्यास Edit या बटनावर क्लिक करुन दुरुस्ती करता येईल.
- ऑनलाईन आवेदनपत्रात भरलेली सर्व माहिती अचूक असल्याची खात्री करुन Submit या बटनावर क्लिक करावे.
- Dashboard मध्ये आपल्या शाळेच्या ऑनलाईन आवेदनपत्र भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी Pending Payment Student List मध्ये दिसेल.

19) **Student Payment - STD. 5th (PUP) -**

- **Student Payment - STD. 5th (PUP)** या बटनावर क्लिक करुन Pending Payment Student List मधील विद्यार्थ्यांचे शुल्क भरण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांच्या नावासमोर असलेल्या चौकटीतील रेडिओ बटनावर क्लिक करुन Make Payment या बटनावर क्लिक करावे. म्हणजे सर्व विद्यार्थ्यांचे एकत्रित शुल्क भरता येईल.
- Make Payment या बटनावर क्लिक केल्यानंतर आपणास Payment Gateway चे पेज स्क्रिनवर दिसेल. त्यामध्ये योग्य त्या पर्यायाची निवड करुन आवश्यक माहिती भरावी व Make Payment या बटनावर क्लिक करुन Payment करण्याची प्रक्रिया पुर्ण करावी.
- त्यानंतर आपणास भरलेल्या शुल्काची ऑनलाईन रिसीट प्राप्त होईल. ती आपल्या दप्तरी जतन करुन ठेवावी.
- ऑनलाईन आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क भरल्यानंतर त्या विद्यार्थ्यांची नावे Successfully Registered Student List मध्ये दिसतील व सदर विद्यार्थ्यांच्या Registration ची प्रक्रिया पुर्ण होईल.
- Successfully Registered Student List मध्ये दिसणारे विद्यार्थीच परीक्षेस पात्र ठरतील.
- परीक्षा शुल्क भरल्याची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन आवेदनपत्रात कोणतीही दुरुस्ती करता येणार नाही.